जनसामान्यांच्या मनातील आरसा
Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028
वरुड | शनिवार
२२.०८.२०२६
वरुड दर्पण
संपादक - चंद्रकांत भा. भड
RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www.waruddarpan.com
9422157712, 8669533485
वर्ष: ०७ | अंक: २०३ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२
अमरावती-नागपूर-चंद्रपुर-वर्धा-यवतमाळ-अकोला-वाशिम-बुलढाणा-खामगांव
+91 7745067712

# उडी मारणाऱ्या मुलाला वाचवतांना आई-वडिलांचाही धक्कादायक मृत्यू

**विशिष्ट कंपनीचा मोबाईल फोन घेवुन देण्यासाठी मुलाने उचलले टोकाचे पाऊल**

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

***छत्रपती संभाजीनगर*** – छत्रपती संभाजीनगरमध्ये वाळूज परिसरातील तिसगावजवळच्या खवड्या डोंगरावर
छत्रपती संभाजीनगर येथील तिसगाव परिसरात असणाऱ्या एका डोंगरावरुन उडी मारुन आत्महत्या करण्याच्या प्रयत्नात असलेल्या मुलाला वाचवताना त्याच्या आई-वडिलांचाही दुर्दैवी मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना काल (२१ ऑगस्ट) घडली.

कुणाल मुरलीधर चांदवडे, मुरलीधर चांदवडे आणि संगीता चांदवडे अशी मृतांची नावे आहेत. कुणालचा वडिलांसोबत वाद झाला होता. त्यानंतर तो सकाळी सुमारे १० वाजता खवड्या डोंगरावर



गेला. त्याचा हेतू टोकाचं पाऊल उचलण्याचा असल्याचं समोर आल्यानंतर आई-वडील त्याला समजावण्यासाठी डोंगरावर पोहोचले. कुणालला समजावण्याचे प्रयत्न सुमारे तीन तास सुरू होते. पोलिस, स्थानिक नागरिक आणि अग्निशमन दलाच्या जवानांनीही त्याला खाली आणण्याचा प्रयत्न केला. त्याला वाचवण्यासाठी खाली जाळी लावण्याचाही प्रयत्न करण्यात आला. मात्र कुणाल वारंवार आपली जागा बदलत होता. अखेर कुणालने डोंगरावरून उडी घेतली. मुलाला वाचवण्याच्या प्रयत्नात वडील मुरलीधर यांचाही तोल गेला आणि ते खाली कोसळले. त्यानंतर मुलगा आणि पती खाली पडल्याचे पाहून आई संगीता यांचाही दुर्दैवी अंत झाला.

**पोलिसांनी दिली चक्रावून टाकणारी माहिती**

सदर घटनेवर पोलीस माध्यमांशी बोलताना म्हणाले की, घटनेबाबत सकाळी फोन आला. फोन आल्यानंतर आमचे ११२ चे कर्मचारी सुरेश भिसे आणि त्यांच्यासोबतचे अंमलदार त्या ठिकाणी खवल्या डोंगरावर एक इसम त्या ठिकाणी आत्महत्या करण्याचा प्रयत्न करत आहे. ११ वाजता ११२ ला कॉल आल्यानंतर तातडीने त्या ठिकाणी जे ११२ चे कर्मचारी गेले आणि त्यानंतर बाकीचे काही कर्मचारी त्या ठिकाणी पोहोचले. तर त्या ठिकाणी एक व्यक्ती त्या ठिकाणी ती डोंगराच्या कडेला खवल्या डोंगराच्या कडेला आत्महत्या करण्यासाठी उभी असल्याची माहिती समजली. त्या ठिकाणी गेल्यानंतर त्यांनी प्रत्यक्ष पाहिले आणि त्याला विनंती करत होते की, बाबा तू आत्महत्या करू नको. या दरम्यान, काही कर्मचाऱ्यांनी लगेच तात्काळ फायर ब्रिगेडला बोलविले. फायर ब्रिगेड तात्काळ त्या ठिकाणी आली आणि डोंगराच्या पायथ्याशी त्यांनी ती जाळी लावली की जर तो पडला तर त्या जाळीमध्ये तो अडकेल आणि त्याचा जीव वाचेल, अशा पद्धतीने प्रयत्न केले. परंतु तो पोलिसांना आणि खालच्या फायर ब्रिगेडला चकमा देऊन वारंवार त्या ठिकाणी जागा बदलायचा प्रयत्न करत होता. त्यामुळे फायर ब्रिगेडलाही वारंवार जागा बदलावी लागत होती. आमचे लोक समजवायचा



प्रयत्न करत होते. त्याची आईही समोर बसून त्याला समजावत होती. मुलाचे मनपरिवर्तनही होत होते. मात्र त्या गर्दीमधून वडील आहे, ते वडील होते, हे पोलिसांना माहिती नव्हते. वडील अचानक डोंगरावर आले आणि त्याला धरून ओढण्याचा प्रयत्न केला, म्हणजे वाचवण्याचा प्रयत्न केला. यावेळी तोल गेल्यामुळे मुलासह त्यांचाही खाली पडून मृत्यू झाला. आईने हे बघताच तिनेही त्यांच्यामागून तात्काळ डोंगरावरुन उडी मारली आणि तिघांचाही या घटनेत मृत्यू झाला, अशी माहिती पोलिसांनी दिली.

**नेमकं प्रकरण काय?**

कुणालचा वडिलांसोबत वाद झाला होता. १५ प्रो कंपनीच्या आयफोन मोबाईलसाठी हट्टाला पेटलेला मुलगा जीव देण्यासाठी खवड्या डोंगरावर पोहोचला. त्यानंतर तो सकाळी सुमारे १० वाजता खवड्या डोंगरावर गेला. त्याचा हेतू टोकाचं पाऊल उचलण्याचा असल्याचं समोर आल्यानंतर आई-वडील त्याला समजावण्यासाठी डोंगरावर पोहोचले. कुणालला समजावण्याचे प्रयत्न सुमारे तीन तास सुरू होते. पोलिस, स्थानिक नागरिक आणि अग्निशमन दलाच्या जवानांनीही त्याला खाली आणण्याचा प्रयत्न केला. त्याला वाचवण्यासाठी खाली जाळी लावण्याचाही प्रयत्न करण्यात आला. मात्र कुणाल वारंवार आपली जागा बदलत होता. अखेर कुणालने डोंगरावरून उडी घेतली. मुलाला वाचवण्याच्या प्रयत्नात वडील मुरलीधर यांचाही तोल गेला आणि ते खाली कोसळले. त्यानंतर मुलगा आणि पती खाली पडल्याचे पाहून आई संगीता यांचाही दुर्दैवी अंत झाला. तिघांचाही डोंगराच्या खाली पडून मृत्यू झाला. घटनेची माहिती मिळताच पोलिस आणि बचाव पथक घटनास्थळी दाखल झाले. तिघांचे मृतदेह बाहेर काढून पुढील कायदेशीर प्रक्रियेसाठी पाठवण्यात आले. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

कुणाल हा डोंगराच्या कड्यावर जवळपास तीन तास उभा होता. तो वारंवार जागा बदलत होता. यादरम्यान, कुणालचे आई-वडील आणि तिसगावच्या ग्रामस्थांनी त्याची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. 'तू जीव देऊन काय होणार आहे, आईकडे बघून तरी जग', असे ग्रामस्थांनी त्याला सांगितले. तिसगावचे सरपंचही याठिकाणी उपस्थित होते. त्यांनी कुणालकडे पाहून म्हटले, ' हे बघ मी सरपंच आहे गावचा, मोबाईल आहे माझ्याजवळ. तुला आयफोन १५ प्रो देऊ', असे त्यांनी म्हटले. त्यावर कुणाल हताशपणे गुडघ्यात वाकला आणि नंतर म्हणाल की, 'आता काहीच सोल्यूशन नाही, एकच सोल्यूशन आहे'. त्यावर कुणालच्या आईने, 'दुसरं सोल्यूशन नाही, असं का वाटतं तुला', असे रडवेल्या आवाजात म्हटले. यानंतर काहीवेळातच वडील जवळ आल्यानंतर कुणालने डोंगराच्या कड्यावरुन शरीर खाली झोकून दिले आणि त्याच्यासोबत वडील आणि त्याच्यापाठोपाठ आई असे तिघेही खाली पडून त्यांचा मृत्यू झाला.

# लोकवर्गणीतून उभी राहलेली स्मशानभूमि ठरताहेत जिल्हयाचे आकर्षण : लोणी मित्रपरिवाराने एकत्रित येत घडविली क्रांती

(प्रतिनीधी वरुड दर्पण)


***लोणी*** – गावातील विकासकामांसाठी शासनाच्या निधीची वाट न पाहता ग्रामस्थांनी एकत्र येऊन लोकवर्गणीतून उभारलेली लोणी येथील स्मशानभूमी सध्या परिसरातील नागरिकांसाठी आकर्षणाचे ठिकाण ठरत आहे. ग्रामस्थांच्या एकजुटीचे आणि सामाजिक बांधिलकीचे हे सुंदर उदाहरण म्हणुन या उपक्रमाकडे पाहिले जात आहे.

स्मशानभूमी म्हटले की, अनेकांच्या मनात भीती किंवा नकारात्मक भावना निर्माण होतात. मात्र लोणी येथील ग्रामस्थांनी आपल्या कल्पकतेतून आणि सामूहिक सहभागातून या संकल्पनेलाच नवे रूप दिले आहे. स्वच्छता, सुशोभीकरण आणि परिसराची देखभाल यामुळे स्मशानभूमीचे स्वरुप बदलून गेले आहे.

गावातील नागरिकांनी लोकवर्गणीतून निधी उभारून स्मशानभूमीचा विकास करण्यासाठी पुढाकार घेतला. या कामात ग्रामस्थांनी आपापल्या परीने योगदान दिले. त्यामुळे ही स्मशानभूमी केवळ अंत्यसंस्काराचे ठिकाण न राहता गावकऱ्यांच्या सामाजिक एकतेचे प्रतीक बनली आहे.

परिसरात स्वच्छता, वृक्षारोपण व सुशोभीकरणावर भर देण्यात आल्याने येथील वातावरण प्रसन्न झाले आहे. नागरिकांमध्ये ही स्मशानभूमीबाबत असलेली







न मागता अनेक लोक आपल्या श्रद्धेय आई-वडिलांच्या स्मृती प्रित्यर्थ कोणी बेंच दान देतात, कोणी अन्य वर्गणी देतात त्याचप्रमाणे आमची लोणी येथील वसंतदास महाराज नागरी पतसंस्थे मार्फत त्या ठिकाणी महामानवांचे पुतळे उभारण्याकरिता १ लक्ष २५ हजार रुपयांचा निधी देऊन पुतळयाकरीता आवश्यक बेस तयार केला त्या माध्यमातून आणखीनच त्याला चांगली शोभा आली, अशी प्रतिक्रिया व.वसंतदास महाराज सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष गोपाल मालपे यांनी व्यक्त केली.

नकारात्मक भावना कमी होऊन तिच्याकडे आदराने पाहिले जात आहे.

विशेष म्हणजे, 'गावासाठी आपणही काहीतरी केले पाहिजे' या भावनेतून ग्रामस्थांनी एकत्र येऊन केलेले हे काम इतर



मोक्षधाम वर सर्व सुविधां देण्याचा आमचा प्रयत्न आहे. सर्व गावकरी तनमनधनाने मदत करतात. गावांतील एकोपा ठेवण्याचा आमचा प्रयत्न आहे, अशी प्रतिक्रिया जेष्ठ नागरिक वासुदेव पोहरकर यांनी व्यक्त केली.

गावांसाठीही प्रेरणादायी ठरू शकते. शासनाच्या मदतीची अपेक्षा ठेवण्याबरोबरच गावकऱ्यांनी स्वतः पुढाकार घेतल्यास अनेक सार्वजनिक ठिकाणांचा कायापालट होऊ शकतो, याचे लोणी येथील स्मशानभूमी हे उत्तम उदाहरण आहे.

लोकवर्गणी, श्रमदान आणि ग्रामस्थांची एकजूट यामुळे साकारलेली ही स्मशानभूमी आता 'गावकऱ्यांच्या एकतेचे प्रतीक' म्हणुन ओळख निर्माण करीत असून, तिच्या देखभालीसाठीही ग्रामस्थांनी अशीच एकजूट कायम ठेवण्याची गरज व्यक्त होत आहे. गावागावात वेशीवर



गावोगावी नैसर्गिक सौंदर्यीकरण करणे काळाची गरज आहे. इश्वर प्राप्तीकरिता थोर संत, महन्त यांचे विचार पुढील पिढीसाठी रूजवणे गरजेचे आहे. त्यामुळे अशा प्रकारे विविध उपक्रम राबविणे गरजेचे आहे. एखादे शापीत स्थळ ही सौंदर्याने कसे फुलून काढता येते याचे उत्तम उदाहरण म्हणजे ही स्मशानभूमी अशी प्रतिक्रिया प्रदिप झाडे यांनी दिली.

निर्जन भागांत मानवी देहावर संस्कार करुन खाचखळग्यातुन वाट काढत परतणारी माणसे स्मशानभूमीतून परत येत असतात. मसणवटी, मृत्युलोक, भूत, पिशाच्च असे काहीसे शब्द त्या जागांकरिता वापरले जातात परंतु लोणीच्या काही समाजधुरिणांनी एकत्र येऊन या संकल्पनांना मूठमाती दिली आणि लोकवर्गणीतून स्वर्गापेक्षाही सुंदर मानवाचे अंतिम स्थान साकारले. येथे भीती नाही तर मनशांती मिळते.

लोणीचे मोक्षधाम हे मानवमंदिर, प्रबोधनाचे केंद्र
लोकवर्गणीतून साकारले स्वर्गापेक्षाही सुंदर मानवाचे अंतिम स्थान,
निसर्गरम्य वातावरण
लोणी येथील स्मशानभूमीचा लोकवर्गणीतून असा



नवयुवकांनी यातून बोध घेवुन गावोगावी अशीच स्मशान भूमी उभारावी तसेच शासनाने सुध्दा स्मशानभूमीसाठी जागा आणि सुविधासाठी फंड द्यावा. आम्ही सर्वजण हे मोक्षधाम राज्यात एक आदर्श मोक्षधाम ठरेल, यासाठी प्रयत्नरत आहोत, अशी प्रतिक्रिया राजेंद्र मालपे यांनी व्यक्त केली.

कायापालट केला आहे, झाले आहे. माणसाने पै-पै जमवून संपत्ती गोळा केली. मोठा झाला, प्रतिष्ठा आली. मात्र, अंत्यसंस्कारांची वेळ आल्यावर गावाच्या वेशीवर किंवा नदीच्या काठावर निर्जनस्थळी नेऊन अग्निसंस्कार केले जातात वा सरकारी जागेत दफनविधी करुन नात्यागोत्यातील सगेसोयरे, मित्रपरिवार आदरांजली देऊन मोकळे होतात. मात्र, लोणी येथील मोक्षधाममधील निसर्गरम्य दर्शन घडविणाऱ्या वातावरणाने निरोप घ्यावासा वाटणार नाही.

एकादशी, सणासुदीला एकत्र येतात गावकरी
सामाजिक कार्यकर्ते वासुदेव पोहरकर यांच्या नेतृत्वात एकत्र येऊन लोकवर्गणी आणि श्रमदानातून स्वर्गापेक्षाही सुंदर मोक्षधाम निर्माण केले. येथे मानवी जीवनाचा संदेश



असा आदर्श घडवून आणण्यासाठी सर्वांनी एकत्रित येणे गरजेचे आहे. त्यासाठी ग्रामपंचायतने सुद्धा सहकार्य अपेक्षित असते. सर्वांच्या प्रयत्नातुनच कोणतीही गोष्ट सहज घडु शकते अन्यथा अनेक अडचणी पुढे येतात अशी प्रतिक्रिया माजी सरपंच नितिन टेंभे यांनी दिली.

देण्याकरिता महामानवांच्या मूर्ती स्थापित करण्यात आल्या. वृक्ष-वेली, फुलझाडे लावली गेली. या मोक्षधामात चिताग्नी देणाऱ्यांकरिता शॉवर लागले तसेच संगीतमय वातावरणात श्रद्धांजली वाहिली जाते. संत तुकाराम, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, वैराग्यमूर्ती गाडगेबाबा, महात्मा जोतिबा फुले, सावित्रीबाई फुले यांच्या प्रबोधनकारी विचारांच्या मानवी जीवनाचा अर्थबोध करणाऱ्या म्हणीतून जीवनातील सत्याचे आकलन होते.

**निःस्वार्थ देखभाल**

मोक्षधाम देखभाल समितीचे वासुदेव पोहरकर, बापूराव मेंढे, राजु मालपे, रवी पापडकर, सुनील मोतीखाये, प्रदीप झाडे, नितीन टेंभे, भारत मेंढे, चंद्रपाल चारे, चंद्रशेखर तायवाडे, प्रभाकर गायकी, सुरेश पाचघरे, सुभाष आगरकर, गजानन बोरकुटे, राजू आगरकर, निखिल बोडखे, विनोद उघडे, लीलाधर कासुर्डे, मिलिंद दुर्गे, ईश्वर सोनारे, योगेश झाडे हे २१ समाजधुरिणांकडून सेवा दिली जाते.

गोपाल मालपे जिल्हा परिषद सदस्य असतांना २००२ ते २००७ हा कालवधी होता. त्यावेळी वारंवार असे वाटत होते की, माझ्या गावातील स्मशानभूमी ही एक तालुक्यामध्ये आदर्श स्मशानभूमी व्हावी आणि कालांतराने अशी एक माझी भोळी संकल्पना होती की, मुले सुद्धा या ठिकाणी येऊन अभ्यास करण्याकरिता यावी, अशी भाबडी कल्पना होती. त्या अनुषंगाने या स्मशानभूमीमध्ये जाण्याकरिता एक जिल्हा परिषदेच्या फंडातून सिमेंट कॉंक्रीटचा रस्ता टाकला की, ज्या ठिकाणी पाऊल टाकायला सुद्धा जागा नव्हती संपूर्ण मातीचा चिखल होता जाण्या येण्यासाठी फार कठीण परिस्थिति होती, अशा परिस्थितीमध्ये त्या ठिकाणी कॉंक्रीटचा रस्ता टाकला आणि तेव्हापासून या ठिकाणची व्यवस्थित येजा सुरु झाली.

त्यानंतर १० वर्ष तंटामुक्त समितीचा लोणी गावाचा अध्यक्ष होते सर्व सवंगडी वासुदेव पोहरकर, राजेंद्र मालपे हे त्या कार्यकारीणीमध्ये माझ्यासोबत होते आणि गावातील अनेक धुर्या बंधाऱ्याचे भांडण किंवा पती पत्नीचे भांडण किंवा इतर सर्व लोकांची जे भांडण स्वरूपातील तक्रारी होत्या त्या मिटवण्याचं वेळोवेळी काम केलं आणि त्यावेळी वेळोवेळी सहकार्य म्हणुन बेनोडाचे ठाणेदार मनीष ठाकरे यांनी मोलाचे सहकार्य केले आणि वेळोवेळी तंटामुक्त समितीला मार्गदर्शन केलं आणि त्या माध्यमातून लोणी या गावातील तंटामुक्त समितीला जिल्ह्यातून प्रथम पुरस्कार प्राप्त झाला आणि त्यावेळी १० लक्ष रुपयाचा निधी त्या माध्यमातून प्राप्त झाला. त्या निधी मधून त्या ठिकाणी झाडांचे वोटे पेविंग ब्लॉक अशा प्रकारचे प्राथमिक स्वरूपाचे काम त्या ठिकाणी केल्या गेले आणि त्यानंतर मग लोकवर्गणीचा ओघ हळूहळू सुरू झाला. आता अलीकडे या ५ वर्षांमध्ये त्याचा भरपूर लोक वर्गणीचा ओघ सुरू झाला आणि त्याकरिता वासुदेव पोहरकर, राजेंद्र मालपे आणि इतर सर्व मंडळींनी अहोरात्र स्वतःची वेळ देऊन त्या ठिकाणी आज ही स्मशानभूमी स्वर्गवत श्वसनभूमी त्या ठिकाणी आपल्याला पाहायला दिसत आहे.

# जलसंधारण ही लोकचळवळ व्हावी : डॉ.अविनाश धोबे : डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी कला महाविद्यालयात जलसंधारण सप्ताह

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**शेंदुरजनाघाट** – येथील जनता शिक्षण संस्था द्वारा संचालित डॉ.श्यामाप्रसाद मुखर्जी कला महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय सेवा योजना व भुगोल विभागाच्या वतीने जलसंधारण सप्ताह साजरा करण्यात आला.

या सप्ताहाच्या अनुषंगाने 'जलसंधारण: काळाची गरज' या विषयावर व्याख्यान




कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ रा.ना.फुलारी, प्रमुख वक्ते म्हणुन मराठी विभाग प्रमुख डॉ.अविनाश धोबे तर अतिथी म्हणुन कार्यक्रमाधिकारी डॉ.लुंबिनी गणवीर उपस्थित होत्या. सहायक कार्यक्रमाधिकारी डॉ. तिलकचंद धोटे यांनी प्रास्तविक करून व्याख्यान कार्यक्रमाच्या आयोजनाची भूमिका व जलसंधारणाचे महत्त्व पटवून दिले.

डॉ.अविनाश धोबे यांनी निसर्गसृष्टी व मनुष्यप्राणी यांचा अतुट संबंध असल्याचे सांगुन मानवाच्या सर्वांगीण कल्याणामध्ये पर्यावरणाचे महत्त्व त्यांनी स्पष्ट केले. वैश्विक तापमान, पर्यावरणाचा ऱ्हास, प्रदूषण, निसर्गाची कत्तल यामुळे जीवसृष्टीचे अस्तित्व धोक्यात येत आहे. त्यामुळे जलसंवर्धन ही काळाची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. त्यासाठी जलसंवर्धन ही लोकचळवळ व्हावी, असे आवाहन याप्रसंगी त्यांनी केले. प्राचार्य डॉ.रा.ना फुलारी यांनी अल निनोच्या प्रभावामुळे पर्जन्यमान कमी होत असल्याने पाण्याच्या प्रत्येक थेंबाचा काटकसरीने वापर करणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे. असे सांगितले. कार्यक्रमाला प्राध्यापक,

## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची उपस्थिती

# मेळघाट महोत्सवाच्या माध्यमातून युवकांना संधी



(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अमरावती** – युवा पिढीला कृत्रिम बुद्धीमत्ता आधारीत तंत्रज्ञानाचा उपयोग करून विविध कौशल्य आत्मसात करता यावे तसेच त्यांना गती असणाऱ्या क्षेत्रात पुढे घेवून जाण्यासाठी पालकमंत्री म्हणून सर्वतोपरी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज येथे केले. मेळघाट महोत्सवात युवकांना सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रात कार्य करण्याची संधी उपलब्ध करून देणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

नवराष्ट्र युथ फाऊंडेशनच्या वतीने येथील सायन्स कोर मैदानावर आयोजित तीन दिवशीय 'अमरावती युवा महोत्सवा'चे उदघाटन पालकमंत्री बावनकुळे यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. आमदार प्रवीण पोटे आणि प्रवीण तायडे, अध्यक्ष हिमांशु पाटील, ह.भ.प. प्रशांत महाराज ठाकरे आदी यावेळी उपस्थित होते.

पालकमंत्री श्री. बावनकुळे म्हणाले, युवा महोत्सवाच्या माध्यमातून जिल्ह्यातील युवक-युवतींची प्रतिभा, सर्जनशिलता आणि सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडणार आहे. येत्या २५ डिसेंबर रोजी चिखलदरा येथे आयोजित करण्यात येणाऱ्या मेळघाट महोत्सवात युवाकांना सांस्कृतिक व सामाजिक क्षेत्रात कार्यकरण्याची संधी उपलब्ध करून देणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

नवराष्ट्र युथ फाऊंडेशनचे अध्यक्ष हिमांशु पाटील यांनी प्रास्ताविक केले. २३ ऑगस्ट पर्यंत चालणाऱ्या या युवा महोत्सवामध्ये दररोज सकाळी १० ते सायंकाळी ६.३० दरम्यान शिक्षणतज्ञांचे व्याख्यान, युथ पार्लमेंट, गरबा नाईट, स्टार्टअप एक्सगो स्पर्धा, अमरावती गॉट टॅलेंट आदी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे.

# राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयात सदभावना प्रतिज्ञा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अमरावती** – भारताचे दिवंगत पंतप्रधान स्व. राजीव गांधी यांच्या जयंती निमित्त जिल्ह्याधिकारी कार्यालयात त्यांच्या प्रतिमेस अतिरिक्त जिल्हाधिकारी गोविंद दानेज यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. तसेच उपस्थित अधिकारी व कर्मचाऱ्यांना 'सद्?भावना दिवस' प्रतिज्ञा दिली.

जात, वंश, धर्म, प्रदेश किंवा भाषा विषयक भेद न करता भावनिक ऐक्य आणि सामंजस्य यासाठी काम करण्याची तसेच सर्व प्रकारचे मतभेद हे हिंसाचाराचा अवलंब न करता संविधानिक मार्गानी सोडविण्याची प्रतिज्ञा उपस्थितांना दिली. याप्रसंगी निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे, अधिक्षक निलेश खटके, विधी अधिकारी नरेंद्र बोहरा आदि अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



# फ्युचर अॅग्रीकल्चर लीडर्स ऑफ इंडिया तर्फे न्यू इंग्लिश हायस्कूल येथे हायड्रोपोनिक शेतीचे मार्गदर्शन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – स्थानिक न्यू इंग्लिश हायस्कूल येथे फॉल फयुचर अॅग्रीकल्चर लिडर ऑफ इंडिया या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना आधुनिक हायड्रोपोनिक शेती तंत्रज्ञानाविषयी मार्गदर्शन करण्यात आले. वाढती लोकसंख्या, शेती योग्य जमिनीची कमतरता आणि पाण्याची उपलब्धता यासारख्या आवाहनांच्या पार्श्वभूमीवर आधुनिक शेती, तंत्रज्ञानाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावुन सांगण्यात आले. यावेळी



मातीविना शेती, पाण्याचा काटकसरीने वापर, पोषकद्रव्यांचे व्यवस्थापन, कि नियंत्रण तसेच एनएफटी, डीप वॉटर कल्चर, ड्रिप हायड्रोपोनिक्स आणि वर्टिकल हायड्रोपोनिक्स या पद्धतींची माहिती देण्यात आली.

या कार्यक्रमाचे मार्गदर्शन शिक्षिका डिंपल गावंडे यांनी केले. विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेत हायड्रोपोनिक शेतीविषयी माहिती जाणून घेतली. मुख्याध्यापक ए.बी.चौधरी, उपमुख्याध्यापक सुरेंद्र देशमुख, शिक्षक, शिक्षिका उपस्थित होते. विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, नवकल्पना आणि आधुनिक शेती तंत्रज्ञानाची आवड निर्माण करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरला.

## जिल्हयातील सहकारक्षेत्रात अग्रणी असलेल्या

# उत्क्रांती पतसंस्थेची येत्या २६ ऑगस्टला वार्षिक सर्वसाधारण सभा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – उत्क्रांती नागरी सहकारी पतसंस्था मर्या जरूड या संस्थेच्या सभासदांच्या अधिमंडळाची वार्षिक सर्वसाधारण सभा येत्या २६ ऑगस्ट रोजी उत्क्रांती शिक्षण संस्थेच्या सभागृहात दुपारी १ वाजता आयोजित करण्यात आली आहे.

या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये संस्थेच्या मागील वर्षातील कामकाजाचा आढावा, आर्थिक अहवाल, ताळेबंद, नफा-तोटा पत्रक तसेच संस्थेच्या आगामी विकासाच्या नियोजनाबाबत चर्चा करण्यात येणार आहे. तसेच सभासदांच्या सूचना व विविध विषयांवर विचार विनिमय करण्यात येणार आहे. प्रशिक्षण देण्याकरिता सहकार बोर्डाचे गवई उपस्थित राहणार असल्याचे सांगण्यात आले.

संस्थेच्या प्रगतीसाठी राबविण्यात येणारे विविध उपक्रम, सभासदांना देण्यात येणाऱ्या सुविधा आणि भविष्यातील विकासाची दिशा याबाबतही सभेमध्ये माहिती देण्यात येणार आहे.

उत्क्रांती नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष रामराव वानखडे यांनी संस्थेच्या सर्व सभासदांनी वार्षिक सर्वसाधारण सभेस आवर्जुन उपस्थित राहून सभेच्या कामकाजात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले आहे. सभासदांच्या सहभागातुन संस्थेच्या विकासाला अधिक बळ मिळेल, असा विश्वासही अध्यक्ष रामराव वानखडे यांनी व्यक्त केला. या सभेला उपस्थित राहण्याचे आवाहन अध्यक्ष रामराव वानखडे, उपाध्यक्ष डॉ.अशोक खोपे, माजी अध्यक्ष देवसिंग खूटपळे, रामकृष्ण मेश्राम, साहेबराव माकोडे, सुरेश कानडे, रमेशराव देशमुख, गजानन बिजवे, वामन सव्वालाखे, राजेंद्र कुऱ्हाडे, सुनील हरले, डॉ.सुशील पाटील, प्रशांत मानेकर, देवल धोटे, जयश्री फुसे, तज्ञ संचालक पुंडलिकराव हरले, रामचंद्र पाटील, कार्यलक्षी संचालक तथा मुख्य व्यवस्थापक राजीव शेलकर, टेंभुरखेडाचे व्यवस्थापक ज्ञानेश्वर घोडकी, वरुडचे व्यवस्थापक राजेंद्र वाडबुदे, बेनोडाचे व्यवस्थापक अंकुश वानखडे, लोणीचे व्यवस्थापक प्रमोद वाडोदे, शेंदुरजनाघाटचे व्यवस्थापक रविंद्र वसुले यांनी एका प्रसिध्दीपत्रकाव्दारे केले आहे.


# स्वातंत्र्य दिन उत्साहपूर्ण व देशभक्तीच्या वातावरणात साजरा

## एमकेएम इंग्लिश स्कूल अॅन्ड ज्युनिअर कॉलेजचे आयोजन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – एम.के.एम.इंग्लिश स्कूल अॅन्ड ज्युनिअर कॉलेज येथे भारताचा स्वातंत्र्य दिन अत्यंत उत्साहपूर्ण व देशभक्तीच्या वातावरणात साजरा करण्यात आला.

विविध देशभक्तीपर कार्यक्रम, विद्यार्थ्यांची भाषणे आणि सांस्कृतिक सादरीकरणामुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाची सुरुवात प्रमुख पाहुणे डॉ.आफरीन खान यांच्या हस्ते ध्वजारोहणाने झाली. याप्रसंगी शाळेतील अनेक पालकांनीही उत्स्फुर्तपणे उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली.



यावेळी नईम काझी व अॅड.तौसीफ कुरेशी यांना विशेष अतिथी म्हणुन आमंत्रित करण्यात आले होते. कार्यक्रमाला ह्युमन वेल्फेअर अॅन्ड एज्युकेशनल ट्रस्टचे सचिव शाहिद रशीद, नियाज़ खान, मुख्याध्यापक अज़हर काज़ी, उपमुख्याध्यापिका आलिया कुरेशी, इम्रान शाह, अब्दुल बासित यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी आणि पालक उपस्थित होते.

# अखिल भारतीय ग्राहक पंचायतच्या वार्षिक डायरीचा लोकार्पण सोहळा उत्साहात

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – जिल्हाध्यक्ष अशोक हांडे यांचे मार्गदर्शनात ग्राहक पंचायत सदस्यता मोहीम २०२६ अंतर्गत पदाधिकाऱ्यांना राष्ट्रीय स्तरावरची दैनंदिन कार्यक्रम नोंदवही पुस्तिका लोकार्पण सोहळा न.प.माजी उपाध्यक्ष किशोर भगत यांचे निवस्थानी पार पडला.

पदाधिकाऱ्यांना नोंदवहीची वाटप करण्यात आले. सदर कार्यक्रमाला उपस्थित जिल्हाध्यक्ष अशोक हांडे, प्रा.संतोष सदा मंचकावर उपस्थित होते.

याप्रसंगी अशोक हांडे व प्रा.संतोष सदा यांनी संघटना कशी मजबुत राहील, तक्रारी निवारण, एमआरपी, माहितीचा अधिकार, ग्राहक संरक्षण कायदा, ऑनलाईन तक्रार नोंदणी / शासनाला निवेदन वर्षभरातील अहवाल सादर करतांनी महत्वपूर्ण विषययावर चर्चा करुन वरुड शहर प्लास्टिक मुक्त कसे बनणार? सदस्यता कशी वाढणार? या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे संचालन दिपक निंबाळकर यांनी केले.

याप्रसंगी तालुकाध्यक्ष प्रकाश पोकळे, महिला तालुका प्रमुख निशा पानसे, उपाध्यक्ष प्रकाश अंबाडकर, मार्गदर्शक तारा बारस्कर, संघटक मंत्री माधुरी भगत, सहसचिव वैशाली मोरस्कर, सदस्या रंजना मालपे, प्रमोद लव्हाळे, जमील पटेल, किशोर भगत, डॉ.संदिप बेहरे, डॉ.शुभा शेळके, रमेश सालपे आदी उपस्थित होते.



## एनटीआर हायस्कूलमध्ये

# परिवहन समितीच्या बैठकीत विविध विषयांवर चर्चा

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – नवयुवक शिक्षण संस्था द्वारा संचालित एनटीआर हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षित प्रवासाच्या दृष्टीने परिवहन समितीची बैठक नुकतीच आयोजित करण्यात आली होती.

या बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक योगेश बरडिया होते तर प्रमुख अतिथी म्हणुन ऑटो




व्हॅन प्रतिनिधी दीपकसिंग ठाकूर, शिक्षिका पल्लवी गोरडे उपस्थित होते.

समितीच्या बैठकीत शाळेच्या बच्ची नियमित तपासणी चालक वाहक जबाबदारी, विद्यार्थ्यांच्या सुरक्षितेसाठी आवश्यक उपाययोजना तसेच बसमध्ये शिस्त राखण्याबाबत चर्चा करण्यात आली. विद्यार्थ्यांना ऑटो, बसमध्ये चढतांना उतरतांना काळजी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या तसेच आपत्कालीन परिस्थिती घ्यावयाच्या खबरदारीबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याचा निर्णय घेण्यात आला.

मुख्याध्यापक यांनी सुरक्षित प्रवास ही शाळेची प्राथमिक जबाबदारी असल्याचे सांगितले. बैठकीच्या शेवटी वाहतुकीचे नियम काटेकोरपणे पाडण्याचा निर्धार केला. या सभेला शिक्षक शिक्षिका, ऑटो व्हॅनचे चालक तसेच पालक प्रतिनिधी उपस्थित होते. सभेचे संचालन व उपस्थितांचे आभार किशोर खवले यांनी मानले.

# संपादकीय

**मेहनत कितीही कठीण असली तरी तिचे फळ नक्कीच गोड असते**

## पेपरफुटी ठरतेय विद्यार्थ्यांसाठी डोकेदुखी

परीक्षा म्हणजे विद्यार्थ्यांच्या वर्षभराच्या मेहनतीची खरी कसोटी. अभ्यास, सराव, वेळेचे नियोजन आणि सातत्य यांच्या जोरावर विद्यार्थी परीक्षेला सामोरे जातात. मात्र, जेव्हा प्रश्नपत्रिका फुटल्याच्या घटना समोर येतात, तेव्हा या संपूर्ण प्रक्रियेवरील विश्वासालाच तडा जातो. मेहनत करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पेपरफुटी ही केवळ बातमी राहत नाही, तर ती त्यांच्या भवितव्याशी जोडलेली गंभीर समस्या बनते.

आज अनेक विद्यार्थी वर्षभर अभ्यास करून, शिकवणी लावून, रात्रीचा दिवस करून परीक्षेची तयारी करतात. त्यांच्यासमोर एकच ध्येय असतेङ्कआपल्या कष्टाच्या जोरावर चांगले गुण मिळवणे. पण परीक्षेपूर्वीच प्रश्नपत्रिका काही व्यक्तींच्या हातात पोहोचत असल्याचे समोर आले, तर प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मनात स्वाभाविकपणे असुरक्षिततेची भावना निर्माण होते. 'आपली मेहनत वाया जाणार का?' हा प्रश्न त्यांना सतावू लागतो.

पेपरफुटीचा सर्वांत मोठा फटका विद्यार्थ्यांच्या मानसिकतेला बसतो. परीक्षा व्यवस्थेवरील विश्वास कमी झाला तर विद्यार्थ्यांचा आत्मविश्वासही डळमळीत होतो. काही विद्यार्थी निराश होतात, तर काहींना चुकीच्या मार्गाचा आधार घेण्याचा मोह निर्माण होऊ शकतो. त्यामुळे पेपरफुटी ही केवळ शैक्षणिक गैरप्रकाराची बाब नसून ती विद्यार्थ्यांच्या मानसिक आणि सामाजिक भवितव्यावर परिणाम करणारी समस्या आहे.

याहून गंभीर बाब म्हणजे अशा प्रकारांमुळे गुणवत्तेवर आधारित स्पर्धेचे महत्त्व कमी होते. ज्याने वर्षभर अभ्यास केला आणि ज्याने गैरमार्गाचा अवलंब केला, या दोघांमध्ये जर समान किंवा उलट परिणाम दिसून आला, तर प्रामाणिक विद्यार्थ्यांच्या मनात व्यवस्थेबद्दल नाराजी निर्माण होणे साहजिक आहे. शिक्षण व्यवस्थेचा पाया हा 'मेहनत आणि गुणवत्ता' यावर असायला हवा; पैशाच्या, ओळखीच्या किंवा गैरप्रकाराच्या जोरावर मिळणाऱ्या यशावर नव्हे.

पेपरफुटी रोखण्याची जबाबदारी केवळ परीक्षा मंडळाची नाही. प्रश्नपत्रिका तयार करण्यापासून ते छपाई, वाहतूक, सुरक्षित साठवणूक आणि परीक्षा केंद्रावर पोहोचेपर्यंत प्रत्येक टप्प्यावर काटेकोर सुरक्षा आवश्यक आहे. ज्या ठिकाणी मानवी हस्तक्षेप अधिक आहे, तिथे जबाबदारी निश्चित करण्याची गरज आहे. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून प्रश्नपत्रिकांची सुरक्षा वाढवणे, डिजिटल ट्रॅकिंग, कडक प्रवेश नियंत्रण आणि संवेदनशील ठिकाणी सीसीटीव्ही यांसारख्या उपाययोजना प्रभावीपणे राबवणे आवश्यक आहे.

पेपरफुटीच्या प्रकरणात दोषी आढळणाऱ्यांवर कठोर आणि जलद कारवाई झाली पाहिजे. केवळ चौकशीचे आदेश देऊन विषय संपविण्याऐवजी दोषींना शिक्षा होणे आणि भविष्यात अशा घटना घडणार नाहीत, असा स्पष्ट संदेश जाणे गरजेचे आहे. त्याचबरोबर एखाद्या पेपरफुटीमुळे संपूर्ण परीक्षा रद्द करण्याची वेळ आली, तर त्याचा त्रास प्रामाणिक विद्यार्थ्यांना होऊ नये यासाठी प्रशासनाने संवेदनशीलपणे निर्णय घ्यायला हवा.

विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित परीक्षांमध्ये पारदर्शकता आणि विश्वास हे सर्वांत महत्त्वाचे घटक आहेत. विद्यार्थ्यांना त्यांच्या मेहनतीवर विश्वास वाटला पाहिजे. पालकांना आपल्या मुलांच्या कष्टाचे योग्य मूल्यमापन होईल, याची खात्री वाटली पाहिजे आणि शिक्षकांनाही परीक्षा व्यवस्था निष्पक्ष असल्याचा विश्वास असला पाहिजे.

पेपरफुटी थांबवण्यासाठी कठोर कायदे आणि सुरक्षा व्यवस्था जितकी आवश्यक आहे, तितकीच आवश्यक आहे ती नैतिक जबाबदारीची जाणीव. प्रश्नपत्रिका लीक करणारा, ती विकत घेणारा, पुढे पाठवणारा किंवा अशा गैरप्रकाराला मदत करणारा प्रत्येक घटक विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळत असतो. त्यामुळे अशा प्रकारांना सामाजिक मान्यता मिळू नये.

आजची गरज आहे ती विद्यार्थ्यांना दोष देण्याची नव्हे, तर परीक्षा व्यवस्थेला अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि विश्वासार्ह बनवण्याची. विद्यार्थ्यांच्या डोक्यावर आधीच अभ्यास, करिअर आणि स्पर्धेचे मोठे ओझे आहे. त्यात पेपरफुटीसारखी डोकेदुखी वाढवणे ही शिक्षण व्यवस्थेसाठी निश्चितच चिंतेची बाब आहे.

विद्यार्थ्यांच्या कष्टाचा सन्मान आणि त्यांच्या भवितव्याची हमी हेच कोणत्याही परीक्षा व्यवस्थेचे अंतिम ध्येय असले पाहिजे. पेपरफुटीला आळा घालण्यासाठी प्रशासनाने कठोर पावले उचलली, तरच 'मेहनत करणाऱ्यालाच यश' ही भावना विद्यार्थ्यांच्या मनात पुन्हा दृढ होईल. पेपरफुटीच्या घटनांमुळे विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होणारी निराशा दूर करण्यासाठी प्रशासनाने त्यांच्याशी पारदर्शक संवाद साधणे गरजेचे आहे. परीक्षेतील गैरप्रकार रोखण्यासाठी स्वतंत्र आणि सक्षम यंत्रणा उभी करून प्रत्येक तक्रारीची तातडीने दखल घेतली पाहिजे.

# हेल्मेट पोलिसांची नव्हे, तर वाहन मालकांची जबाबदारी



रस्त्यावर वाहन चालवताना हेल्मेट वापरणे हा केवळ वाहतूक पोलिसांपासून दंड वाचवण्याचा मार्ग नाही, तर स्वतःचा जीव सुरक्षित ठेवण्याची मूलभूत जबाबदारी आहे. दुचाकीस्वारांच्या अपघातांमध्ये डोक्याला झालेली गंभीर दुखापत अनेकदा जीवघेणी ठरते. त्यामुळे हेल्मेटचा प्रश्न हा कायद्यापुरता मर्यादित न राहता तो प्रत्येक वाहनचालकाच्या आणि वाहन मालकाच्या सुरक्षिततेशी जोडलेला आहे.

आज अनेक ठिकाणी हेल्मेटसक्तीची चर्चा झाली की, पोलीस कारवाई का करत नाहीत? पोलीस कुठे आहेत?, दंड का आकारला जात नाही? असे प्रश्न विचारले जातात. मात्र या प्रश्नांपेक्षा महत्त्वाचा प्रश्न असा आहे की, आपण स्वतःच्या सुरक्षिततेसाठी हेल्मेट का वापरत नाही? रस्त्यावर वाहन चालवताना पोलिसांची नजर प्रत्येक क्षणी आपल्यावर असू शकत नाही. परंतु अपघात कोणत्याही क्षणी होऊ शकतो. अशावेळी पोलिसांची अनुपस्थिती आपल्याला सुरक्षित ठेवू शकत नाही; हेल्मेट मात्र डोक्याला गंभीर इजा होण्याचा धोका कमी करण्यास मदत करू शकते.

### हेल्मेट म्हणजे दंडापासून बचाव नव्हे

अनेक वाहनचालक हेल्मेट केवळ पोलिसांची भीती म्हणून वापरतात. चौकात पोलीस दिसले की हेल्मेट डोक्यावर, आणि पुढे गेल्यावर पुन्हा हेल्मेट हातात किंवा वाहनाच्या हँडलला लटकलेले दिसते. ही मानसिकता बदलण्याची गरज आहे. हेल्मेट हे पोलिसांसाठी नव्हे, तर आपल्या कुटुंबासाठी आहे.

एखादा अपघात झाल्यानंतर त्या वेळी हेल्मेट घातले असते तर... अशी खंत व्यक्त करण्यापेक्षा वाहन सुरू करण्यापूर्वी हेल्मेट घालणे अधिक शहाणपणाचे आहे. काही सेकंदांचा हा निर्णय आयुष्यभराचा फरक निर्माण करू शकतो.

### वाहन मालकाची जबाबदारी अधिक मोठी

घरातील पालक आपल्या मुलांना दुचाकी देताना ज्या पद्धतीने वाहनाची चावी देतात, त्याच पद्धतीने सुरक्षिततेची जाणीवही देणे आवश्यक आहे. अल्पवयीन किंवा तरुण चालकाला वाहन देताना हेल्मेट आहे का, वाहन चालवण्याचा परवाना आहे का, वाहतुकीचे नियम माहीत आहेत का, याची खात्री करणे ही पालकांची आणि वाहन मालकांची सामाजिक जबाबदारी आहे.

माझे काम वाहन देण्यापुरते आहे, हेल्मेट घालणे त्याची जबाबदारी, अशी भूमिका योग्य नाही. वाहन मालकाने सुरक्षिततेच्या नियमांचे पालन करण्यास प्रवृत्त केले पाहिजे. विशेषतः घरातील सदस्य, कर्मचारी किंवा मुलांना वाहन देताना 'हेल्मेटशिवाय वाहन नाही' हा नियम घरातूनच लागू झाला पाहिजे.

### पोलिसांची भूमिका आवश्यक, पण मर्यादित

वाहतूक नियमांचे पालन करून घेणे ही पोलिसांची महत्त्वाची जबाबदारी आहे. नियम मोडणाऱ्यांवर कारवाई झालीच पाहिजे. मात्र प्रत्येक रस्त्यावर, प्रत्येक चौकात आणि प्रत्येक वाहनाच्या मागे पोलीस उभे राहू शकत नाहीत. वाहतूक व्यवस्था केवळ पोलिसांच्या कारवाईवर चालू शकत नाही.

शिस्त ही पोलिसांच्या भीतीतून नव्हे, तर नागरिकांच्या स्वेच्छेने निर्माण झाली तरच वाहतूक सुरक्षित होईल. पोलीस दंड करू शकतात; पण जबाबदारीची जाणीव प्रत्येकाच्या मनात निर्माण करणे ही समाजाची सामूहिक जबाबदारी आहे.

### तरुणाईने विशेष काळजी घेण्याची गरज

दुचाकी चालवताना वेगाचा थरार, मोबाईलचा वापर, तिघांनी प्रवास करणे, हेल्मेट न घालणे किंवा वाहतुकीचे नियम धुडकावणे या गोष्टी अनेकदा तरुणांमध्ये दिसून येतात. काही क्षणांचा निष्काळजीपणा संपूर्ण कुटुंबाला आयुष्यभराचे दुःख देऊ शकतो.

तरुणांनी हे लक्षात घेतले पाहिजे की, रस्त्यावर आपण एकटे नसतो. आपल्या चुकीमुळे स्वतःबरोबरच समोरच्या वाहनचालकाचा किंवा पादचाऱ्याचाही जीव धोक्यात येऊ शकतो. त्यामुळे वेगापेक्षा सुरक्षितता आणि स्टाइलपेक्षा हेल्मेट महत्त्वाचे आहे.

### हेल्मेट वापरण्याची संस्कृती निर्माण झाली पाहिजे

हेल्मेटसक्ती ही केवळ दंडात्मक मोहीम राहू नये. शाळा, महाविद्यालये, सामाजिक संस्था, व्यापारी संघटना आणि स्थानिक प्रशासन यांनी जनजागृती केली पाहिजे. ङ्कहेल्मेट घालाङ्क एवढे सांगण्यापेक्षा ङ्कहेल्मेट का घालावे?ङ्क हे लोकांना समजावून सांगणे आवश्यक आहे.

वाहन विक्रेत्यांनीही नवीन वाहन देताना सुरक्षिततेबाबत मार्गदर्शन करावे. पालकांनी मुलांना वाहन देताना हेल्मेटची सक्ती करावी. मित्रांनी मित्राला हेल्मेटशिवाय वाहन चालवताना पाहिले तर त्याला थांबवावे. कारण अपघात झाल्यानंतर मदत करण्यापेक्षा अपघात टाळण्यासाठी केलेली छोटीशी सूचना अधिक महत्त्वाची ठरते.

नियम स्वतःपासून सुरू करू या.

आपण अनेकदा प्रशासनाकडून शिस्तीची अपेक्षा करतो; पण स्वतःच्या वर्तनाकडे दुर्लक्ष करतो. रस्त्यावर वाहतूक नियम पाळणे, हेल्मेट घालणे, वेगावर नियंत्रण ठेवणे, मोबाईलचा वापर टाळणे आणि वाहनाची योग्य देखभाल करणे या सवयी प्रत्येकाने स्वतःपासून सुरू केल्या पाहिजेत.

पोलिस दिसले म्हणून हेल्मेट घालू नका; पोलिस दिसत नसतानाही हेल्मेट घाला. कारण पोलिसांचा दंड काहीशे किंवा काही हजार रुपयांचा असू शकतो; परंतु अपघातात जीव गमावण्याची किंमत कोणत्याही पैशात मोजता येत नाही.

### शेवटी...

हेल्मेट हा वाहतूक पोलिसांचा विषय नाही, तो आपल्या जीवनाचा विषय आहे. पोलिसांची भीती संपली म्हणून हेल्मेट काढण्याची मानसिकता बदलली पाहिजे. वाहनाची चावी हातात घेताना हेल्मेट डोक्यावर असणे हीच खरी सुरक्षिततेची सुरुवात आहे.

### हेल्मेट पोलिसांसाठी नाही, आपल्या जीवासाठी आहे.

प्रत्येक वाहन मालकाने स्वतःसाठी, आपल्या कुटुंबासाठी आणि समाजासाठी एक संकल्प करावाङ्कहेल्मेटशिवाय दुचाकी चालवणार नाही आणि हेल्मेटशिवाय कोणालाही आपले वाहन चालवू देणार नाही.

आज घेतलेली ही छोटीशी काळजी उद्याचे मोठे संकट टाळू शकते. त्यामुळे हेल्मेटसाठी पोलिसांची वाट पाहू नका; जबाबदारी स्वतः स्वीकारा आणि सुरक्षित प्रवासाला सुरुवात करा.

### प्रत्येक वाहनचालकाने पुढे येण्याची गरज

आज रस्त्यावर वाहनांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. शहर असो वा ग्रामीण भाग, दुचाकी, चारचाकी, ट्रॅक्टर आणि इतर वाहनांची सतत वर्दळ असते. वाहनांची संख्या वाढत असताना वाहतुकीचे प्रश्नही वाढत आहेत. अपघात, वाहतूक कोंडी, नियमांचे उल्लंघन आणि निष्काळजीपणा यामुळे अनेकांचे जीवन धोक्यात येत आहे. या परिस्थितीत केवळ वाहतूक पोलिसांनी कारवाई करावी, प्रशासनाने नियम कडक करावेत किंवा सरकारने नवीन योजना आणाव्यात, अशी अपेक्षा करून चालणार नाही. प्रत्येक वाहनचालकाने स्वतःहून पुढे येऊन वाहतूक शिस्त पाळण्याची गरज आहे. वाहतूक नियम हे पोलिसांसाठी केलेले नियम नसून नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आहेत. सिग्नल तोडणे, चुकीच्या दिशेने वाहन चालवणे, वेगाने वाहन चालवणे, मोबाईलवर बोलत वाहन चालवणे, हेल्मेट न घालणे किंवा सीटबेल्टचा वापर न करणे या सवयी केवळ नियमभंग नाहीत, तर त्या स्वतःच्या आणि इतरांच्या जीवाला धोका निर्माण करतात.

### पोलिसांची नजर नसली तरी नियम पाळा

रस्त्यावर प्रत्येक ठिकाणी पोलीस उभे राहू शकत नाहीत. त्यामुळे ङ्कपोलीस नाहीत म्हणून नियम पाळायचे नाहीतङ्क ही मानसिकता बदलणे अत्यंत आवश्यक आहे. चौकात पोलीस असताना हेल्मेट घालणे आणि पुढे गेल्यावर ते काढणे, सिग्नलवर पोलीस नसल्यास सिग्नल तोडणे, हा शिस्तीचा मार्ग नाही.

खरी वाहतूक शिस्त तेव्हाच निर्माण होईल, जेव्हा पोलिसांची भीती नसतानाही प्रत्येक वाहनचालक नियमांचे पालन करेल.

### हेल्मेट आणि सीटबेल्ट ही जबाबदारी

दुचाकीस्वारांसाठी हेल्मेट आणि चारचाकी वाहनचालकांसाठी सीटबेल्ट ही सुरक्षिततेची मूलभूत साधने आहेत. अनेकदा काही जण हेल्मेट केवळ दंडापासून वाचण्यासाठी वापरतात. मात्र हेल्मेटचा खरा उद्देश जीव वाचवणे हा आहे.

वाहनचालकांनी स्वतः हेल्मेट वापरण्याबरोबरच मागे बसलेल्या व्यक्तीलाही हेल्मेट देणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे चारचाकीत प्रवास करणाऱ्या प्रत्येकाने उपलब्ध सुरक्षितता साधनांचा योग्य वापर केला पाहिजे.

### तरुण वाहनचालकांनी आदर्श घालून द्यावा

तरुणाईकडे वेग, उत्साह आणि नवे प्रयोग करण्याची ऊर्जा असते. मात्र हीच ऊर्जा जबाबदारीने वापरली तर रस्ते अधिक सुरक्षित होऊ शकतात. वेगाने वाहन चालवणे, स्टंट करणे, मोबाईलवर व्हिडिओ बनवणे किंवा वाहतुकीचे नियम मोडणे हे धाडस नसून स्वतःच्या आणि इतरांच्या जीवाशी खेळ आहे.

तरुणांनीच पुढाकार घेऊन आपल्या मित्रांना नियम पाळण्यास प्रवृत्त केले पाहिजे. तू हेल्मेट घातलेस का? हा प्रश्न मित्राला विचारणे ही देखील सामाजिक जबाबदारी आहे.

# दाजीसाहेब चव्हाण : महाराष्ट्रातून राष्ट्रीय राजकारणात ठसा उमटविणारे नेतृत्व

दाजीसाहेब चव्हाण यांच्या राजकीय कारकिर्दीचा केंद्रबिंदू कराड मतदारसंघ होता. लोकसभेत दीर्घकाळ कराडचे प्रतिनिधित्व करताना त्यांनी आपल्या मतदारसंघाशी असलेले नाते जपले. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी प्रेमलाबाई दाजीसाहेब चव्हाण यांनीही राजकारणात सक्रिय भूमिका घेतली आणि कराडच्या राजकीय परंपरेला पुढे नेले. भारताच्या राज्यसभा सदस्यांच्या अधिकृत चरित्रात्मक नोंदीत प्रेमलाबाई चव्हाण यांच्या लोकसभा व राज्यसभा सदस्यत्वाची नोंद आहे.

### पुढील पिढीवरही उमटला प्रभाव

दाजीसाहेब चव्हाण यांच्या सार्वजनिक जीवनाचा वारसा पुढील पिढीतही दिसून आला. त्यांचे पुत्र पृथ्वीराज दाजीसाहेब चव्हाण पुढे महाराष्ट्राच्या राजकारणातील महत्त्वाचे नेते झाले आणि २०१० ते २०१४ या काळात महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली.

त्यामुळे दाजीसाहेब चव्हाण यांची राजकीय परंपरा ही केवळ एका व्यक्तीपुरती मर्यादित राहिली नाही; तिने महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनात पुढील पिढ्यांनाही प्रेरणा दिली.

### साधेपणा, अभ्यास आणि सार्वजनिक जीवन

त्या काळातील राजकारणात वैचारिक अभ्यास, संघटनात्मक काम आणि लोकांशी प्रत्यक्ष संपर्क यांना मोठे महत्त्व होते. दाजीसाहेबांच्या शिक्षणाचा



आणि विविध प्रशासकीय जबाबदाऱ्यांचा त्यांच्या राजकीय कार्यावर प्रभाव दिसून येतो. स्थानिक राजकारणापासून संसद आणि केंद्र सरकारपर्यंतचा त्यांचा प्रवास हा महाराष्ट्रातील नेतृत्वाच्या विकासाचा महत्त्वाचा अध्याय मानता येईल. आजच्या राजकारणात अनेकदा पदाला अधिक महत्त्व दिले जाते. मात्र दाजीसाहेब चव्हाण यांच्या कारकिर्दीकडे पाहिल्यास दीर्घकाळ लोकप्रतिनिधी म्हणून काम करणे, विविध खात्यांची जबाबदारी सांभाळणे आणि राष्ट्रीय पातळीवर योगदान देणे ही त्यांच्या सार्वजनिक जीवनाची ठळक वैशिष्ट्ये दिसतात.

### स्मरणातून मिळणारी प्रेरणा

दाजीसाहेब चव्हाण यांचे आयुष्य आजच्या पिढीसाठी अनेक अर्थांनी प्रेरणादायी आहे. ग्रामीण भागातून पुढे येऊन उच्च शिक्षण घेणे, सार्वजनिक जीवनात प्रवेश करणे, संसदेत दीर्घकाळ जनतेचे प्रतिनिधित्व करणे आणि केंद्र सरकारमध्ये विविध जबाबदाऱ्या सांभाळणे हा त्यांचा प्रवास निश्चितच उल्लेखनीय आहे.

२२ ऑगस्ट हा त्यांचा जन्मदिवस. त्यामुळे त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या कार्याचे स्मरण करणे म्हणजे केवळ एका राजकीय नेत्याला अभिवादन करणे नव्हे, तर लोकसेवा, अभ्यासू नेतृत्व आणि सार्वजनिक जबाबदारी या मूल्यांना उजाळा देणे होय.

दाजीसाहेब चव्हाण यांचे कर्तृत्व महाराष्ट्राच्या राजकीय इतिहासातील एक महत्त्वपूर्ण पर्व आहे. त्यांच्या कार्याची आठवण नव्या पिढीला लोकशाहीतील जबाबदार नेतृत्वाची प्रेरणा देत राहो, हीच त्यांच्या जयंतीनिमित्त खरी आदरांजली!

दाजीसाहेब चव्हाण यांच्या जीवनाकडे पाहिल्यास एक गोष्ट प्रकर्षाने जाणवते. `लोकप्रतिनिधी होणे म्हणजे केवळ निवडणूक जिंकणे नव्हे, तर विविध क्षेत्रांचे ज्ञान घेऊन जनतेच्या प्रश्नांना राष्ट्रीय व्यासपीठावर मांडणे होय.

शिक्षण, सार्वजनिक जीवन, संसदीय कार्य आणि प्रशासन या सर्वांचा समन्वय त्यांच्या कारकिर्दीत दिसतो. त्यामुळे त्यांच्या जयंतीनिमित्त केवळ त्यांच्या राजकीय पदांची आठवण न करता त्यांच्या सार्वजनिक जीवनातील कार्यपद्धतीचा आणि लोकसेवेच्या विचारांचा अभ्यास करणे अधिक महत्त्वाचे ठरते. २२ ऑगस्ट हा दाजीसाहेब चव्हाण यांचा जन्मदिवस. त्यांच्या स्मृतींना अभिवादन सरकारपर्यंत पोहोचलेले त्यांचे नेतृत्व आजही सार्वजनिक जीवनात काम करणाऱ्यांसाठी प्रेरणादायी ठरते. २२ ऑगस्ट हा दाजीसाहेब चव्हाण यांचा जन्मदिवस. त्यांच्या स्मृतींना अभिवादन करताना त्यांच्या कार्यातून मिळणारा सर्वात मोठा संदेश असा–राजकारण हे सत्तेसाठी नव्हे, तर समाज आणि राष्ट्राच्या सेवेसाठी असले पाहिजे.

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# न्यू कॅलिफोर्निया स्कूल येथे पालकसभा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**वरुड** – बेनोडा येथील गुरु सेवा शैक्षणिक विकास संस्था संचालित न्यू कॅलिफोर्निया इंग्लिश प्रायमरी स्कूल येथे पालक सभा नुकतीच घेण्यात आली.

पहिल्या दिवशी नर्सरी केजी वन, केजी टू च्या विद्यार्थ्यांच्या पालकांची, दुसरे दिवशी वर्ग पहिली ते तिसरीची पालक सभा, तिसरे दिवशी वर्ग चौथी ते सहावीची पालक सभा तर चवथ्या दिवशी सातवी ते दहावीची पालक सभा घेण्यात आली. पालक सभेमध्ये पालकांच्या प्रश्नांचे निवारण करण्यात आले तसेच विद्यार्थ्यांच्या भवितव्याबद्दल चर्चा करण्यात आली. या सभेमध्ये पालकांच्या समस्या समजून त्यावर विचारपूर्वक तोडगा काढण्यात आला. सभेला पालकांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

# बोरखेडी व चामला गावांत १०० टक्के ई-पिक पाहणी पूर्ण

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वर्धा** – खरीप हंगाम २०२६-२७ मधील ई-पिक पाहणी मोहिमेत आष्टी तालुक्याने उल्लेखनीय कामगिरी केली आहे. तालुक्यातील बोरखेडी व चामला या गावांमध्ये १०० टक्के ई-पिक पाहणीचे काम पूर्ण झाले असून जिल्हात १०० टक्के ई-पिक पाहणी पुर्ण करणारी ही पहिली गावे ठरली आहेत. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल तहसीलदार ऐश्वर्या गिरी यांच्या हस्ते दोन्ही गावांतील पोलिस पाटलांचा प्रशस्तीपत्र देऊन विशेष गौरव करण्यात आला.




शासनाच्या महत्त्वाकांक्षी ई-पिक पाहणी मोहिमेंतर्गत खरीप हंगाम २०२६-२७ मध्ये शेतकऱ्यांनी आपल्या शेतातील पिकांची ऑनलाइन नोंद करणे आवश्यक आहे. आष्टी तालुक्यात ई-पिक सहाय्यकांच्या माध्यमातून डीसीएचएमएच या मोबाईल ॲप्द्वारे शेतकऱ्यांच्या पिकांची ऑनलाइन नोंदणी करण्यात येत आहे.

बोरखेडी व चामला गावांमध्ये ग्रामपातळीवरील पोलिस पाटलांनी ग्राम महसूल अधिकारी, ई-पिक सहाय्यक तसेच शेतकऱ्यांशी समन्वय साधत ही मोहिम प्रभावीपणे राबविली. बोरखेडी येथील पोलिस पाटील प्रणीता धनराज लोमटे यांनी गावातील सर्व शेतकऱ्यांची १०० टक्के ई-पिक पाहणी पुर्ण करण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले. तसेच चामला येथील पोलिस पाटील गंगाधर बिटने यांनी प्रत्यक्ष शेतात जाऊन प्रत्येक शेतकऱ्याला भेट देत ई-पिक पाहणी पूर्ण करून घेण्यासाठी प्रशासनाला सहकार्य केले. दोन्ही पोलिस पाटलांनी गावकऱ्यांशी उत्तम समन्वय साधून उद्दिष्ट वेळेत पूर्ण केले. त्यांच्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत तहसीलदार ऐश्वर्या गिरी यांच्या हस्ते त्यांना प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

# देशभक्तीच्या स्वरांनी दुमदुमला छत्रीतलाव परिसर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



**अमरावती** – भारताचा स्वातंत्र्य दिन १५ ऑगस्ट रोजी सर्वत्र उत्साहात साजरा करण्यात आला. नागरिकांच्या मनात देशभक्तीची भावना कायमस्वरूपी रुजावी तसेच एकात्मतेची संस्कृती जपली जावी, या उद्देशाने निरंतर कार्यरत असलेल्या निसर्गप्रेमी सांस्कृतिक चळवळ कला-मंचाच्या १८० व्या आठवड्यात स्वातंत्र्य दिनाचा विशेष कार्यक्रम छत्रीतलाव परिसरात उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सन्माननीय श्री. भोजराज काळे सर, स्वीकृत नगरसेवक तथा अध्यक्ष, निसर्गप्रेमी सांस्कृतिक चळवळ कला-मंच होते. यावेळी सौ. वंदनाताई आत्राम, नगरसेविका, सौ. जयश्रीताई वानखडे, समाजसेविका, तसेच अमरावती शहरातील विविध मान्यवर आणि कलाकारांची प्रमुख उपस्थिती होती. राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

यानंतर कला-मंचाच्या कलाकारांनी देशभक्तीपर गीतांची सुरेल मैफल सादर केली. 'मेरे देश की धरती', 'मेरे देश प्रेमियों आपस में प्रेम करो', 'देश रंगीला मेरा', 'मेरा मुल्क मेरा देश', 'तू मेरा कर्मा', 'जिंदगी मौत ना बन जाए', 'ऐ मेरे वतन के लोगो', 'देखो वीर जवानों' अशा विविध गीतांनी संपूर्ण छत्रीतलाव परिसर देशभक्तीच्या स्वरांनी दुमदुमून गेला.

या कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे अरुणाचल प्रदेश येथे बीएसएनएलमध्ये कार्यरत अधिकारी मधुकर गायकवाड साहेब आणि कांचन गायकवाड मॅडम यांची विशेष उपस्थिती. स्वातंत्र्य दिनाच्या पर्वावर देशातील दोन भिन्न प्रदेशातील या परिवाराचा झालेला संगम उपस्थितांसाठी भावनिक आणि संस्मरणीय ठरला.

# गांधी विद्यालयात ध्वजारोहण

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अमरावती** – भारताचा स्वतंत्र दिन हा संपूर्ण भारतात मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येतोय.तेव्हा त्याच स्पर्शभूमीवर अमरावती तालुक्यातील बडनेरा येथील गांधी विद्यालय रेल्वे स्टेशन, जुनी वस्ती येथे भारताचा स्वतंत्र दिवस हा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आलाय.त्यावेळी सर्वप्रथम सकाळी ८ वाजता दरम्यान प्रमुख पाहुणे या– मनोज कैथवास, महादेव इंगोले, किशोर मिसाळ, मदन भाऊ गुजर,यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले.तेव्हा भारत माता की जय,वंदे मातरम च्या घोषणा ही देण्यात आल्यात.त्यावेळी कार्यक्रमास अंकित कैथवास, करण इंगोले, अक्षय कोहरे, दुर्गेश चैतुरकर, अर्जुन इंगोले, वैभव टोम्पे, मुकुंदा मोरे, पुष्पक नांदुरकर, पंकज कैथवास, रोशन कोहरे, ऋषिकेश चव्हाण, रितेश गिरी, सय्यद इसराइल, दिलीप बालवेल, शिव बक्सारे, आयुष मडाईत तसेच मोठ्या संख्येने स्थानिक रहिवासी उपस्थित होते



# अभ्यासात प्रामाणिकपणा आणि सातत्य हे स्पर्धा परीक्षेत यश मिळवण्याचे गमक : नुरुल हसन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**लाखनी** – स्पर्धा परीक्षेच्या जगात अभ्यासात सातत्य आणि प्रामाणिकपणा महत्वाचे असतो. सातत्य कायम ठेवून ग्रामीण भागातील विद्यार्थी देखील यामध्ये मोठे यश मिळवू शकतो. यासाठी शालेय वयापासून नियमित वाचन करणे महत्वाचे आहे, असे प्रतिपादन जिल्हा पोलिस अधीक्षक नुरुल हसन यांनी केले.

ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा, करिअर आणि प्रशासकीय सेवांबाबत योग्य मार्गदर्शन मिळावे, तसेच यशस्वी अधिकाऱ्यांचा थेट संवाद विद्यार्थ्यांना उपलब्ध व्हावा, या उद्देशाने स्वप्नपूर्ती बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने 'ऑफिसर्स टॉक' या उपक्रमाचे आयोजन लाखनी करण्यात आले. यामध्ये झालेल्या प्रकट मुलाखतीत ते बोलत होते. जवळपास दोन तास चाललेल्या या कार्यक्रमात स्पर्धा परीक्षेची तयारी, अभ्यासाचे तंत्र व नियोजन, 'प्लॅन बी' आणि एकविसाव्या शतकातील आव्हाने अशा विविध विषयांवर त्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. दिल्लीस्थित पत्रकार प्रशांत वाघाये यांनी नुरुल हसन यांच्याशी संवाद साधला.




या कार्यक्रमाला लाखनीच्या तहसीलदार शीतल घावटे, अतिरिक्त खंड विकास अधिकारी प्रशांत पोशेट्टी, सहायक पोलीस निरीक्षक अचल कपूर, वरिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी सुभाष बावनकुळे, जिल्हा परिषद सदस्या डॉ.मनिषा निंबार्ते, डॉ.स्वाती वाघाये, ज्येष्ठ साहित्यिक प्रल्हाद सोनेवाणे, डॉ.चंद्रकांत निंबार्ते, माजी जिल्हा परिषद जयकृष्ण फेंडरकर, वृषाली खेडीकर, मुख्याध्यापक संजय वनवे उपस्थित होते.

# वीर वामनरावच्या चिमुकल्यांच्या जयघोषाने दुमदुमला शाळेचा परिसर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अमरावती** – श्री हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ संचालित, वीर वामनराव जोशी प्राथमिक शाळेत संस्थेचे प्रधानसचिव पद्मश्री प्रभाकरराव वैद्य व शालेय समितीच्या अध्यक्षा डॉ.माधुरी चेंडके यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांसाठी सातत्याने विविध सांस्कृतिक, शैक्षणिक व सामाजिक उपक्रमांचे आयोजन केले जाते. याच उपक्रमांचा एक भाग म्हणून स्वातंत्र्य दिन शाळेत अत्यंत उत्साहपूर्ण, आनंददायी व देशभक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला.



स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने शाळेतील विद्यार्थ्यांसह पालकांमध्येही मोठा उत्साह दिसून आला. शाळेच्या गणवेशातील विद्यार्थ्यांसोबतच अनेक विद्यार्थी विविध सांस्कृतिक वेशभूषेत उपस्थित झाले होते. कोणी महात्मा गांधी, कोणी पंडित जवाहरलाल नेहरू, कोणी सावित्रीबाई फुले, तर कोणी झाशीची राणी लक्ष्मीबाई यांच्या वेशभूषेत आले होते. अनेक चिमुकले विद्यार्थी सैनिकी पोशाखात हाती बंदूक घेऊन, तर काही विद्यार्थी तिरंगा हातात घेऊन देशभक्तीचा संदेश देत होते.

शाळेचे मुख्याध्यापक दिलीप सदार यांच्या हस्ते ध्वजारोहण होताच विद्यार्थ्यांनी टाळ्यांच्या कडकडाटात देश की रक्षा कौन करेगा? हम करेंगे, हम करेंगे! तसेच माता की जय! अशा जोशपूर्ण घोषणा देत संपूर्ण शाळेचा परिसर दुमदुमून सोडला. या जयघोषातून विद्यार्थ्यांच्या मनातील देशप्रेम व राष्ट्रभक्तीचा उत्स्फूर्त आविष्कार पाहायला मिळाला.

# दहावी परीक्षेसाठी 31 ऑक्टोबरपर्यंत अर्ज भरण्याचे आवाहन

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळामार्फत फेब्रुवारी-मार्च २०२७ मध्ये होणाऱ्या माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र (इयत्ता दहावी) परीक्षेसाठी विद्यार्थ्यांचे ऑनलाइन अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. नियमित विद्यार्थी, पुनर्परीक्षार्थी, नावनोंदणी प्रमाणपत्र प्राप्त झालेले खासगी विद्यार्थी, श्रेणीसुधार योजनेअंतर्गत तसेच आयटीआयच्या 'ट्रान्सफर ऑफ क्रेडिट' योजनेतील विद्यार्थ्यांनी त्यांच्या शाळा प्रमुखांमार्फत ३१ ऑक्टोबरपर्यंत अर्ज सादर करावेत, असे आवाहन महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने केले आहे.

राज्य मंडळाने जाहीर केलेल्या वेळापत्रकानुसार नियमित शुल्कासह अर्ज भरण्याची मुदत ३१ ऑक्टोबर २०२६ अशी आहे. विलंब शुल्कासह अर्ज १ नोव्हेंबर ते १५ नोव्हेंबर २०२६ या कालावधीत स्वीकारले जातील. तर अतिविलंब शुल्कासह अर्ज १६ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर २०२६ पर्यंत भरता येणार आहेत. माध्यमिक शाळांनी विद्यार्थ्यांकडून परीक्षा शुल्क संकलित करून ते निर्धारित पद्धतीने मंडळाकडे जमा करावे. शुल्क पावत्या व विद्यार्थ्यांची यादी विभागीय मंडळांकडे ७ डिसेंबर २०२६ पर्यंत सादर करावयाची आहे. मंडळाने सर्व माध्यमिक शाळांना अर्ज भरण्यापूर्वी विद्यार्थ्यांची माहिती अचूक असल्याची खात्री करण्याच्या सूचना दिल्या आहेत. अर्जातील नाव, जन्मतारीख व अन्य तपशील काळजीपूर्वक तपासून विद्यार्थी आणि पालकांच्या स्वाक्षऱ्या घेण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

## सोने-चांदीचे दर

शुध्द सोने -९६१०८१० रु.(१०ग्रॅम)

२२.कॅ सोने - ९४,७०० रु.(१०ग्रॅम)

चांदी - १,३०,००० रु. (प्र.किलो)

## कृषी उत्पन्न बाजार समिती अमरावती

बाजारभाव ( क्विंटलमध्ये )

| | | |
|---|---|---|
| ज्वारी | १६५० | २००० |
| गहू | २५०० | २७०० |
| तूर | ७७५० | ८४०१ |
| मूग | ६७०० | ७२५० |
| उडीद | ६५०० | ७१०० |
| हरभरा | ५६०० | ६२७५ |
| सोयाबिन | ५८०० | ६३६४ |
| बाजरा | २००० | २३०० |
| तिळ | १०५०० | ११५०० |
| भुईमूग | ५१५० | ५३५० |
| मका | १७०० | १८०० |

## ७१ हजार रूपयांच्या बक्षीसाचे लकी ड्रॉद्वारे वितरण

# 'महा वॉकेथॉन' मध्ये युवकांचा उत्साहात सहभाग

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अमरावती** – नागरिकांमध्ये जलसंधारणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी आज शहरात 'महा वॉकेथॉन : 'वॉक फॉर वॉटर' उपक्रम पार पडला. सकाळी शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या मैदानावर एकत्र येत युवकांनी वॉकेथॉनमध्ये उत्साहात सहभाग घेतला. यावेळी लकी ड्रॉद्वारे दहा सहभागींना पारितोषिके देण्यात आली.




जलसंवर्धन, पाणी बचत आणि पर्यावरण संरक्षणाचा संदेश वॉकेथॉनमधून देण्यात आला. या वॉकेथॉनला श्री शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयापासून सुरुवात झाली. विभागीय आयुक्त नयना गुंडे, श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन देशमुख यांनी वॉकेथॉनला हिरवी झेंडी दाखवून सुरुवात केली. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे, अधिक्षक अभियंता दिलीप निपाणे, उपजिल्हाधिकारी ज्ञानेश्वर घ्यार, पाटील, जलसंधारणाचे कार्यकारी अभियंता सुनील जाधव, श्रीकांत उमप, सोनाली काकडे, मुख्याधिकारी विकास खंडारे, शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाचे प्राचार्य गावंडे आदी उपस्थित होते.

सुरुवातीला विभागीय आयुक्त श्रीमती गुंडे यांच्या हस्ते जलपुजन करण्यात आली. तसेच उपस्थितांना जलसंधारणाची शपथ देण्यात आली. पंचवटी चौक, गर्ल्स हायस्कूल चौक, जिल्हा कोषागार कार्यालय आणि सिंचन भवन या मार्गे वॉकेथॉन शिवाजी शारीरिक शिक्षण महाविद्यालयाच्या मैदानावर पाहोचली. याठिकाणी वॉकेथॉनचा समारोप करण्यात आला.

# मृद व जलसंवर्धन रील्स स्पर्धेला 31 ऑगस्टपर्यंत मुदतवाढ

## मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांची माहिती

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**मुंबई** – माजी मुख्यमंत्री स्वर्गीय सुधाकरराव नाईक यांच्या कार्याला अभिवादन म्हणून २१ ऑगस्ट रोजी राज्यभर 'जलसंधारण दिन' साजरा करण्यात येत आहे. यानिमित्त मृद व जलसंधारणाबाबत व्यापक जनजागृती करण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या 'महा वॉकेथॉन–वॉक फॉर वॉटर' आणि 'मृद व जलसंवर्धन रील्स स्पर्धे'ला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. या प्रतिसादाची दखल घेत मृद व जलसंवर्धन रील्स स्पर्धेसाठी रील्स अपलोड करण्याची मुदत आता ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे, अशी माहिती मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांनी दिली.

मृद व जलसंवर्धनाबाबत नागरिक, विद्यार्थी आणि युवकांमध्ये जनजागृती व्हावी, तसेच या विषयाशी संबंधित नाविन्यपूर्ण उपक्रमांना प्रोत्साहन मिळावे, या उद्देशाने रील्स स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेसाठी यापूर्वी १९ ऑगस्ट २०२६ पर्यंत रील्स अपलोड करण्याची मुदत निश्चित करण्यात आली होती.

मात्र, क्षेत्रीय स्तरावर या स्पर्धेला मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद आणि रील्स तयार करून अपलोड करण्यासाठी उपलब्ध झालेला कमी कालावधी लक्षात घेऊन स्पर्धेला मुदतवाढ देण्याची मागणी करण्यात आली होती. या मागणीची दखल घेत रील्स अपलोड करण्याची अंतिम मुदत ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत वाढविण्याचा शासन निर्णय घेण्यात आला असल्याचे त्यांनी सांगितले.

मृद व जलसंधारण ही केवळ शासनाची जबाबदारी नसून, त्यामध्ये समाजातील प्रत्येक घटकाचा सहभाग आवश्यक आहे. 'माती वाचवा, पाणी जपा, सुरक्षित भविष्य घडवा' या संदेशातून नागरिकांनी या अभियानात सहभागी व्हावे असे आवाहन मंत्री संजय राठोड यांनी केले.




# अशोक सराफ यांनी मराठी सिनेमाला वेगळी उंची दिली : मुख्यमंत्री

**अभिनेते अशोक सराफ यांचा नागपूर येथे नागरी सत्कार**

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नागपुर** – मराठी माणसाच्या जीवनातील संघर्ष, वास्तव, मर्यादा, दुःख आणि आनंद हे अशोक सराफ यांच्या कलाकृतींमध्ये दिसतात. सर्वसामान्यांच्या जीवनातील या भावभावनांना त्यांनी आपल्या अभिनयातून हास्याची आणि आनंदाची किनार दिली.मराठी सिनेमा खऱ्या अर्थाने लोकाभिमुख करून या सिनेमाला वेगळी उंची प्राप्त करून देण्याचे कार्य अभिनेते अशोक सराफ यांनी केले असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

ज्येष्ठ चित्रपट अभिनेते महाराष्ट्र भूषण पद्मश्री अशोक सराफ यांच्या नागरी सत्कार सोहळ्यानिमित्त वसंतराव देशपांडे सभागृहात झालेल्या कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. नागपूर महानगरपालिका, विदर्भ गौरव प्रतिष्ठान आणि श्री सिद्धीविनायक ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने हा कायर्क्रम आयोजित करण्यात आला होता. महापौर नीता ठाकरे, विदर्भ गौरव प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.गिरीश गांधी, श्री सिद्धीविनायक सेवा ट्रस्टचे अध्यक्ष, माजी आमदार संदीप जोशी, उपमहापौर लीला हाथीबेड, स्थायी समिती अध्यक्ष शिवानी दाणी-वखरे, नागपूर मनपातील सत्ता पक्षनेते नरेंद्र बोरकर, मनपा आयुक्त डॉ. विपीन इटनकर यावेळी उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, अशोक सराफ यांच्यासारखे कलाकार लाभणे ही मराठी रंगभूमी, चित्रपटसृष्टी आणि रसिकांसाठी अभिमानाची बाब आहे. त्यांच्या कलेचे कौतुक करण्यासाठी आणि त्यांच्या योगदानाचा गौरव करण्यासाठी नागरी सत्कार हा नागपूरकरांच्या वतीने कृतज्ञता व्यक्त करण्याचा क्षण आहे.






# आठवडी बाजारातील दुकानदारांना कायमस्वरुपी जागा द्या

**ग्रामस्थांची सरपंच व ग्रामविकास अधिकारी यांचेकडे मागणी**

(प्रमोद बोंदरकर)

**चांदस वाठोडा** - वाठोडा येथील आठवडी बाजारातील सर्व दुकानदारांना नियोजनबध्द पध्दतीने कायमस्वरुपी जागा उपलब्ध करुन देण्यात यावी, अशी मागणी ग्रामस्थांच्या वतीने सरपंच व ग्रामविकास अधिकारी यांचेकडे एका निवेदनाव्दारे केली आहे.

या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, वाठोडा येथील आठवडी बाजार हा अनेक वर्षापासुन परिसरातील शेतकरी, व्यापारी, हातगाडी व्यावसायिक तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या उदरनिर्वाहाचे



महत्त्वाचे साधन आहे. या बाजारामध्ये दर आठवड्याला मोठ्या संख्येने व्यापारी व नागरिक येत असल्यामुळे गावाच्या आर्थिक विकासालाही मोठा हातभार लागतो.

परंतु सध्या आठवडी बाजारातील दुकानदारांना योग्य व नियोजनबद्ध जागा उपलब्ध नसल्यामुळे त्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत आहे. यामुळे बाजारातील वाहतूक, नागरिकांची गैरसोय तसेच व्यापाऱ्यांमध्ये वाद निर्माण होण्याची शक्यता वाढत आहे. त्यामुळे या समस्येवर तात्काळ तोडगा काढणे अत्यंत आवश्यक आहे. त्यामुळे ग्रामपंचायतीने उपलब्ध जागेचे योग्य नियोजन करून सर्व दुकानदारांना समान व कायमस्वरूपी जागा उपलब्ध करून द्यावी. या विषयाची गांभीर्याने दखल घेऊन आवश्यक असल्यास संबंधित वरिष्ठ अधिकारी व महसुल प्रशासन यांची मदत घेऊन ग्रामपंचायतीच्या उपलब्ध जागेवर नियोजनबद्ध पद्धतीने सर्व दुकानदारांना योग्य व कायमस्वरुपी जागा उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी भोजराज उघडे, सरिता मांगलकर, सुनिल देशमुख, अरुणा बारसकर, ईश्वर उपासे, रवी देशमुख, शितल सराटकर, प्रदिप भुसारी, सुर्यकांता उघडे, मंगेश इंगळकर, विलास घाडसे, गजेद्र भुसारी, बाबुराव वागद्रे, अरुणा बारस्कर यांनी केली आहे.

# केवासी प्रक्रिया पुर्ण झालेल्या शेतकऱ्यांना नविन पिक कर्ज द्या

**शेतकऱ्यांची वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे निवेदनाव्दारे मागणी**

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** - पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत पात्र शेतकऱ्यांची केवासी प्रक्रिया पुर्ण असलेल्या शेतकऱ्यांना नविन पिक कर्ज वाटप करण्यात यावे, अशी मागणी शेतकऱ्यांच्या वतीने वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे एका निवेदनाव्दारे करण्यात आली आहे.

या निवेदनात नमुद करण्यात आले आहे की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत केवासी प्रक्रिया पुर्ण झालेल्या आहेत. त्यानुसार ज्या शेतकऱ्यांचे पिक कर्जखात्याला कर्जमाफी रक्कम जमा झालेल्या आहेत त्या शेतकऱ्यांना नविन पिक कर्जवाटप लवकरात लवकर वितरण होणे अत्यंत आवश्यक आहेत. वरुड तालुक्यातील पात्र शेतकऱ्यांची कर्जमाफी प्रक्रिया तातडीने पूर्ण करावी, कर्जमाफी झालेल्या शेतकऱ्यांना नवीन पीक कर्ज तात्काळ उपलब्ध करुन द्यावे तसेच पात्र शेतकऱ्यांचे कर्जखाते अपडेट करून बँकांनी नवीन कर्जासाठी अडथळे दूर करावेत, कर्जमाफीच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांना खरीप हंगामासाठी कर्ज मिळण्यात विलंब करु नये, बँकांनी पात्र शेतकऱ्यांचे नवीन पीक कर्ज अर्ज तातडीने निकाली काढावेत, कर्जवाटपात दिरंगाई करणाऱ्या सबंधित यंत्रणेवर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कारवाई करावी, नविन पिक कर्ज ८ दिवसांचे आत वाटप करण्यात यावेत, यासंदर्भात सर्व बँकांना निर्देश देण्यात यावेत अन्यथा तिव्र आंदोलन करण्यात येईल, असा ईशारा मनिष धोटे, अंकुश बोडनासे, चंद्रकांत बोडनासे, योगेश बोडनासे, अजय गाडगे, पुंडलिक निकम, सुनिल गावंडे, सारंग बोडनासे, सतिश धोटे, अजिंक्य देशमुख, अविनाश सदापुरे, नंदकिशोर टाकरखेडे आदींनी दिला आहे.



